अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# आपची महाराष्ट्रातून माघार दिल्लीवर मदार

आम आदमी पार्टीने महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका लढवायच्या नाहीत. असा निर्णय घेऊन एका अर्थी आपल्या मर्यादाच मान्य केल्या आहेत. मात्र यासाठी दिलेले कारण तितकेच हास्यास्पद आणि पक्षाच्या दृष्टीने धोकादायक म्हणावे लागेल. पार्टीने आपली सगळी ताकद आगामी विधानसभा निवडणुकीसाठी लावायचे ठरवले आहे. आता हा निर्णय आम आदमी पार्टीतल्या आम कार्यकर्त्याला विचारून घेतला की केवळ अरविंद केजरीवाल यांनी पक्षाच्या गळी उतरवला हे कळायला मार्ग नाही. परंतु पक्षाने महाराष्ट्रासारख्या विधानसभा निवडणुकीतून पूर्ण माघार घेणे ही गोष्ट राजकीयदृष्ट्या तितकीशी पटणारी ठरत नाही. महाराष्ट्रातून माघार आणि दिल्ली निवडणुकीवर सगळी मदार असे जणूकाही अस्तित्वाचे नवे धोरण आम आदमी पार्टीने निश्चित केलेले दिसते. लोकसभा निवडणुकीत सपाटून मार खाऊनही आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांची खुमखुमी उतरलेली दिसत नाही. कारण देशात अन्य कुठेच निवडणुका लढवायच्या नाहीत. आणि पुन्हा एकदा सगळे लक्ष दिल्लीत केंद्रीत करायचे. यामागे पुन्हा एकदा अरविंद केजरीवाल यांची महत्वाकांक्षा आडवी आलेली दिसते.

आतापर्यंत त्यांनी पार्टीचा याच पध्दतीने वापर केला.आपले हट्ट पूर्ण करून घेतले. अगदी राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या हट्टापासून ते दिल्ली विधानसभा निवडणुकीत विजय मिळाल्यानंतर मुख्यमंत्री पद पटकावण्यापर्यंत किंवा लोकसभेच्या निवडणुकीत वाराणसीत उभे राहून सगळे लक्ष आपल्यावर केंद्रीत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. खरे तर त्यांनी स्वत: निवडणूक न लढवता लोकसभेच्या वेळेला देशभर प्रचार करण्यासाठी फिरायला हवे होते. आपण निवडून येण्यापेक्षाही आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार कसे जिंकतील असा व्यापक विचार त्यांनी करायला हवा होता. परंतु देशभरातल्या सर्व उमेदवारांना वाऱ्यावर सोडून केजरीवालांना वाराणसीतील स्वत:ची वरात महत्वाची वाटली. दुर्दैवाने त्यांचे हे अतिसाहस फलद्रूप झाले नाही. आतादेखील पुन्हा एकदा त्यांनी महाराष्ट्रातल्या अनेक कार्यकर्त्यांना नाराज करून दिल्लीवर स्वारी करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. दिल्लीतून पूर्वीसारखा या पक्षाला प्रतिसाद मिळेल याची खात्री देता येत नाही. परंतु केजरीवालांच्या व्यक्तिगत राजकीय आकांक्षेपोटी आम कार्यकर्त्यांची फरफट मात्र जोरात सुरू आहे.

## अयोग्य निर्णय

हा पक्ष स्थापन झाल्यावर सर्वप्रथम किंवा त्या पक्षाने पहिली निवडणूक म्हणून दिल्लीसाठी प्रयत्न केला.पक्षाचे बरेच कार्यकर्ते आणि नेते दिल्ली, हरियाणा, पंजाब या भागात राहणारे आहेत. याशिवाय अण्णा हजारे यांच्या आंदोलनामुळे या पक्षाचा दिल्लीतला पाया चांगलाच भक्कम झाला होता. खरे तर ही निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच अरविंद केजरीवाल यांनी अण्णांच्या आंदोलनाचा व्यवस्थित वापर करून घेतला. त्यांचा हा राजकीय मनसुबा कोणाच्याच लक्षात आला नाही. अण्णांच्या तर मनीमानसीही नव्हते की या आंदोलनानंतर केजरीवाल राजकीय पक्ष स्थापन करतील किंवा त्यांचा कल राजकारणाकडे इतका झुकेल याची देखील त्यांना कल्पना आली नव्हती. भ्रष्टाचाराविरुध्दचा लढा उभारणे आणि जणूकाही या दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्यातून भारत भ्रष्टाचार मुक्त करणे एवढेच अण्णांचे ध्येय होते. सलग तेरा दिवस उपोषण करून अण्णांच्या आंदोलनाने विलक्षण जनजागृती झाली. मात्र तीच केजरीवालांसाठी राजकीय जागृती ठरली. अण्णांच्या बरोबरीने काम करणारे केजरीवाल त्यांच्या शब्दाबाहेर जाणार नाहीत असे अनेकांना वाटत होते. राजकीय पक्ष स्थापन करण्याची योजना त्यांनी अण्णांना सांगितल्यानंतर त्याला अण्णांनी स्पष्ट विरोध केला, त्यापेक्षा राज्यकर्त्यांवर दबाव टाकणारे आणि नैतिकतेच्या बळावर जनजागृती करणारे आंदोलन ही आज देशातील गरज आहे, असे सांगूनही केजरीवालांनी आपलेच घोडे पुढे दामटले.

अण्णांविषयी आंदोलनाच्या काळात असलेला आदर अण्णांनी विरोध केल्याबरोबर अचानक ओसरला आणि केजरीवालांना मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने पडू लागली. आतादेखील याच इच्छापूर्तीसाठी त्यांनी महाराष्ट्राच्या निवडणुकीकडे पूर्ण पाठ फिरवून दिल्ली डोक्यावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. स्वत:साठी सगळ्या पक्षाला वेठीला धरण्याचा आणि इतर राज्यातला पक्ष गोठवण्याचा हा अजबच निर्णय म्हणावा लागेल. दिल्लीच्या आगामी निवडणुकांसाठी केजरीवाल यांनी अगदी देशभरातले कार्यकर्ते जरी गोळा केले आणि वेगवेगळी प्रकरणे बाहेर काढून खास दिल्ली निवडणुक मसाला जरी तयार केला तरी त्याचा पूर्वीसारखा प्रभाव पडणार नाही हे त्यांनी नीट समजून घेतले पाहिजे. बदललेल्या परिस्थितीत अर्धवट आणि अपुऱ्या तयारीनिशी दिल्ली निवडणुक लढवण्याचा त्यांचा निर्णय पूर्वीसारखा यशस्वी होण्याची शक्यता दिसत नाही.

## ना सिध्दांत ना भूमिका

एकतर कोणताही राजकीय पक्ष संघटना किंवा संस्था स्थापन करायची असेल तर त्याचे तितकेच काटेकोर नियोजन करावे लागते. कार्यकर्त्यांचे जाळे तयार करून त्यांना काही मुलभूत तत्व असणारी वैचारिक सामुग्री द्यावी लागते. पक्ष असो किंवा संघटना असो. तिथले सिध्दांत निश्चित करावे लागतात आणि भूमिकाही ठाम असाव्या लागतात. आज या पक्षाकडे यापैकी काहीच नाही. दिल्ली निवडणुकीमध्ये कोणत्या मुद्यांच्या जोरावर निवडणुक लढवावी किंवा नेमकी कोणती भूमिका घ्यावी अशी देखील त्यांची संभ्रमावस्था पहायला मिळते.

भ्रष्टाचाराविरुध्द लढा देणारा हा पक्ष आणि साधेपणाने राहणारे नेते किंवा कार्यकर्ते अशी प्रतिमा आम आदमी पार्टीने निर्माण केली होती. सामान्य माणसाचे प्रश्न घेऊन लढणारा हा पक्ष म्हणूनच सामान्य माणसालाही जवळचा वाटत होता. दिल्लीत भरमसाठ वीज आकारणीसारखा प्रश्न हातात घेऊन निवडणुका लढवल्या गेल्या. त्याचा आम आदमी पार्टीला लाभही झाला. परंतु पक्षाकडे कोणताही निश्चित सिध्दांत आणि निवडणुका नसल्यामुळे सत्ता मिळाल्यानंतर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. स्वत:ची राजकीय महत्वाकांक्षा हा केजरीवालांचा छुपा सिध्दांतच त्यावेळी देखील पक्षाला महाग पडला. लोकांनी विश्वासाने दिलेली सत्तादेखील त्यांना टिकवता आलेली नाही. अशा परिस्थितीत पक्षाच्या हाताशी वेगळे काय लागणार असा प्रश्न निर्माण होतो आणि म्हणूनच महाराष्ट्रातही या पक्षामध्ये संभ्रम दिसून येतो.